# प्रभु तरुण

| वर्ष ५६ | अंक ०१ | मुंबई | १६ सप्टेंबर, २०२३ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## प्रभुतरुण चिरायू होवो!

—सुहासिनी कीर्तिकर

दिनांक पंचवीस ऑगस्टला प्रभुतरुणाने आपला शंभरावा वाढदिवस 'अजि म्यां आनंदे' पाहिला. त्यादिवशी मला अनेक जणांचे शुभसंदेश आले, फोन्स आले. खरे तर; तेव्हापासूनच या ऐतिहासिक वाढदिवसाची आनंददायी हवा वातावरणात भरून राहिली होती. मग दिनांक सत्तावीस रोजी हा वाढदिवस अंधेरी येथील 'सुबा इंटरनॅशनल' मध्ये आगळ्या पद्धतीने निमंत्रितांच्या उपस्थितीत साजरा झाला.

शंभरावा वाढदिवस! एखाद्या ज्ञातीपत्राचा होणे; ही ऐतिहासिक गोष्टच. या सोहळ्याच्या प्रमुख अतिथी होत्या निवृत्त न्यायाधीश सौ. बागेश्री योगेन परीख. सुरुवातीला मी प्रमुख संपादक या नात्याने प्रास्ताविक केले. 'प्रभुतरुण चिरायू होवो' असे म्हणण्याच्या माझ्या प्रस्तावाला सभागृहातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. श्रीनल कोठारे यांनी काढलेली कै. विहंग नायक आणि कै. सुहास कोठारेंची रेखाचित्रे मंचावर होतीच. माझ्या भाषणाआधी त्यांच्या प्रतिमांना बागेश्रीताई आणि मी पुष्पहार घातले, विश्वस्त श्री बन्सी धुरंधर यांनी फुले वाहिली. ही भावपूर्ण आदरांजली म्हणजेच आपल्या कृतज्ञ भावनेचा दीप उजळणे होते. त्यामुळे त्या सात्विक तेजात न्हाऊनच 'चिरायू' प्रभुतरुणाचा शंभरावा वाढदिवस साजरा झाला.

या वर्षी या सोहळ्यात भविष्यवेधी घटना सामावलेली होती. मित्रहो; मी गेली सव्वीस वर्षे हे संपादकपद सांभाळले आहे. 'की तरू फुटे आणखी भराने' या न्यायाने काळाची गरज समजून घेऊन पावले उचलली तरच भविष्य घडविता येते. त्यामुळे विश्वस्तांना मी विनंती केली होती की आता संपादक बदलावा. आनंदाची आणि उमेद वाढविणारी बाब अशी की प्रभुतरुण युवामंचाने यातून भविष्यवेधी तोडगा काढला. नोव्हेंबर-डिसेंबर असा जोड अंक दिवाळी अंक म्हणून काढला की त्यानंतर प्रभुतरुण कात टाकणार आहे. 'प्रभतरुण बुलेटिन'ने याची सुरुवात झालीच आहे; तर या चार बुलेटिन्सच्या अनुभवाच्या बळावर त्यानंतर पूर्ण प्रभुतरुणच 'डिजीटल फॉर्म' मध्ये येईल. तेव्हा हे तंत्र-मंत्र सांभाळण्याचे काम करण्यासाठी अनुभवी तरुण मंडळी पुढे आलीत. टाईम्स ऑफ इंडिया - त्यातीलच 'महाराष्ट्र टाइम्स' आणि आता 'सामना' मध्ये प्रासंगिक घटनांसाठी म्हणून संपादक असलेल्या कल्पना राणे या संपादनाची धुरा वहाणार आहेत आणि आपल्या प्रभावी इंग्रजी लेखनाने अनेक पुस्तकांची शानदार निर्मिती नावावर असलेले श्री. रोहित त्रिलोकेकर सहसंपादक असणार आहेत. वाढदिवसाच्या या सोहळ्यात म्हणूनच या तरूण संपादकांचे स्वागत आणि अर्थातच माझा निरोप समारंभही होता. हळदीकुंकू जसे जोडीने येते, तसा मला निरोप आणि या संपादकद्वयांचे स्वागत एकत्रितच झाले.

तर आता जे उपस्थित नव्हते त्यांच्यासाठी या प्रसंगाची थोडीशी चुणूक... (कारण पूर्ण समारंभ शब्दात पकडणे अवघडच.) प्रथम माझी ओळख विश्वस्त श्री गौरांग कीर्तिकर यांनी करून दिली. मग फार मार्मिक, अर्थपूर्ण भेट मला देण्यात आली ती बागेश्रीताईंच्या हस्ते. कोणती? तर प्रभुतरुणाची शंभर वर्षांपूर्वीची पहिल्या अंकाची पहिली प्रत! यातील औचित्य शब्दांत व्यक्त करण्याजोगे नाहीच मुळी. पण या एकाच भेटीवर थोडेच भागणार? प्रभुतरुणाच्या कोषाध्यक्ष डॉ. सौ. सुरेखा धुरंधर मंचावर आल्या. त्यांनी मला देण्यासाठी अत्यंत सुंदर असे तयार केलेले मानपत्र वाचून दाखवले. 'जो स्वत:ची महती सांगे। तो एक मूर्ख।' असे रामदासस्वामींनी 'मूर्खांची लक्षणे' सांगताना म्हटले आहे. पण ही महती मी नाही सांगितली बरे. प्रभुतरुणाची संपादक म्हणून मी जे थोडेबहुत काम केले; त्या संदर्भात मला मिळालेली ती पावतीच होती. भारावून टाकणारी, भावुक करणारी. मग हे मानपत्र मला बागेश्रीताईंच्या हस्ते प्राप्त झाले. केव्हढा मोठा सन्मान माझा! एक छानसे रोपटेही मिळाले. पण एवढे अपुरे म्हणून की काय; संजना (प्रभुतरुणाची कार्यकारी संपादिका) मंचावर आली अन् तिने सुंदर साडी माझ्याभोवती शालीसारखी लपेटली. भारावून टाकणारे हे अपूर्व क्षण होते! मग मी माझ्या संपादकीय कारकीर्दीचा भावूक होऊन आढावा घेतला. (लिहीतानाही मी इतकी भावून झालेय की हा आढावा मी आधी घेतला की नंतर?... तेही धड आठवत नाही.) आढावा घेतला अन् कृतज्ञताही व्यक्त केली. काय म्हटलं मी त्या क्षणी?.... साधारण गोषवारा असा -

''कै. सुहास कोठारे सतत गुणवंतांच्या शोधात असायचे. गिरगावात भेटले की मला म्हणायचे, ''तरुणासाठी काही लिहा हो.'' मग मी 'संवाद स्पंदने' हे सदर लिहीले. नंतर कधीतरी 'आहे मनोहर तरी' या सुनीताबाईंच्या आत्मचरित्रावर त्यांनी अभिप्राय पाठवला; तर त्यांना त्याचे सौजन्यपूर्ण उत्तर आले. त्या निमित्ताने सुरेश विठ्ठल सभागृहात 'आहे मनोहर तरी' वर रसास्वाद घेणारा कार्यक्रम आखला गेला. मी एक वक्ता होते तेव्हा. माझे लेखन, माझे भाषण यांचा या निमित्ताने गवगवा झाला. 'प्रभुतरुणा'च्या पंच्याहत्तरी निमित्ताने होणाऱ्या आयोजनात मला सहभागी करून घेण्यात आले. पद्मश्री डॉ. सदाशिव गोरक्षकरांची पाठारे प्रभु संदर्भात एक चर्चासत्र घेण्याची सूचना होती. त्यानिमित्ताने अंधेरी येथील राणेवाडीत चर्चासत्र, रथातून प्रभु जोडप्याची मिरवणूक, विविध विक्री दुकाने आदी कार्यक्रमाची आखणी झाली. 'निवडक प्रभुतरुण' पुस्तक प्रकाशित करायचे ठरले. या पुस्तकाची संपादिका मी होते. साहित्य संघात वाजत गाजत दिंडी काढून हे पुस्तक पालखीतून मिरवत मंचावर आले. हे सर्व होत असतानाच दुर्दैवाने सुहास कोठारे आपल्याला सोडून गेले. मग त्यांच्या पश्चात् विहंग नायक संपादक झाले अन् मी कार्यकारी संपादिका. एक प्रशासक म्हणून, एक संपादक म्हणून त्यांचा माझा सूर फान छान जुळला होता. 'मिले सुर मेरा तुम्हारा!' आम्ही 'अतिथी संपादक' ही नवकल्पना राबवून एका वर्षात चोवीस संपादकांना लिहीते केले. युवामंचच्या कार्यकर्त्यांत भर पडली. अंधेरी येथील वर उल्लेखिलेला भव्य सोहळा याच विहंग आणि माझ्या कारकीर्दीत संपन्न झाला. परिसंवादाचे सूत्रसंचालन माझे होते अन् रवीन्द्र पिंगे, प्रमोद नवलकर प्रमुख अतिथी होते या कार्यक्रमात. विहंगबरोबरची दहा वर्षे कार्यकारी संपादक म्हणून स्मरणात रहाण्याजोगी. त्यांचे संपादकीय आणि माझे विस्तारीत संपादकीय. विहंग यांचे अचानक जगाच्या रंगभूमीवरून निघून जाणे झाले. मग पुन्हा संपादक कोण?.. एक यक्ष प्रश्न. गेल्याच आठवड्यात निधन झालेल्या माझ्या बहिणीच्या घरी (नंदिनी देसाई यांच्या घरी) प्रभुतरुणाची बैठक झाली. माझ्यावर संपादकपदाची जबाबदारी सोपवण्यात आली. कार्यकारी संपादक म्हणून सौ. संजना कोठारे, सौ. मयुरा नायक, सौ. मीनाक्षी जयकर आणि सौ. वैजयंती कीर्तिकर सक्सेना या 'चारचौघी'ची मला मोलाची मदत झाली. (त्यात इतरही बरेच युवा होते, पण काळाच्या लाटेत याच चौघी टिकल्या.) याच माझ्या कारकीर्दीत 'प्रत्युष'चे तीन थाटामाटात प्रयोग झाले. सुभाष राव यांनी ज्ञाती बातम्या दिल्या. विविध लेखक यांनी मला प्रतिसाद दिला. प्रदीप कोठारे यांनी सलग दहा वर्षे सातत्याने व्यंगचित्रे दिली. पोस्ट, 'आरएनआय', न्यायालय आदी ठिकाणी अधिकृत

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम ४ वरून)

नोंदणीसाठी ते सतत माझ्याबरोबर राहिले. श्री अजित विजयकरांनी मला नलिनी तळपदेंसारखी लेखिका मिळवून दिली. सौ. अचला देसाई यांनी सौमित्र वेलकर यांचा ‘खानाखजाना’ मिळवून दिला. वृंदा जयकरांनी जातीतील घडामोडींची नोंद माझ्यापर्यंत पोचवली. प्रतिमा प्रधानांनी दिवाळी अंकासाठी ‘भाऊबीज’ मिळविण्यात पुढाकार घेतला. दीपक धैर्यवानांनी दिवाळी अंकासाठी जाहिराती मिळवल्या... अशी अनेकांनी प्रभुतरुणाची तळी उचलून धरली. नवे, जुने लेखक; नवी सदरे, नव्या संकल्पना, दिवाळी अंकात नवी मांडणी... आदींमुळे प्रभुतरुण सतत ताजा आणि तरुण राहिला. महानुभाव पंथात मुक्तीची कल्पना थोडी वेगळी आहे. जीव हा बद्धमुक्त असतो असे ते मानतात. मीदेखील संपादकाच्या जबाबदारी-तून मुक्त आणि तुम्हा सर्वांच्या प्रेमाने बद्ध आहे...’’ असे कितीतरी मी मनापासून बोलले. मग नवीन येऊ घातलेल्या संपादक कल्पना राणे यांना माझ्या हस्ते प्रभुतरुणाची पहिली प्रत देऊन नवयुगाची सुरुवात झाली. रोहित त्रिलोकेकर आणि कल्पना राणे या दोघांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रभुतरुणाच्या वाढदिवशी किती गोष्टी घडाव्यात? ॲड. सुंदर नवलकरांच्या इच्छापत्रानुसार रुपये सात हजारांची बक्षिस रक्कम कै. मुकुंद विनायक नवलकर यांच्या स्मृत्यर्थ ज्ञाती कलाकाराला देण्यासाठी प्रभुतरुणाकडे सोपवण्यात आली. हे पारितोषिक कलाकार नीला त्रिलोकेकर यांना बागेश्रींच्या हस्ते बहाल करण्यात आले. त्यांनी ज्ञाती कलाकारांचे प्रदर्शन भरवून स्वत:च्या कलेबरोबर हे सामाजिक, सांस्कृतिक कार्यही केले; त्याची ही पोचपावती होती.

या प्रदर्शनाविषयी आपल्या प्रभुतरुणात श्री. दीपक धैर्यवान, सौ. सुजाता कीर्तिकर आणि माधुरी कीर्तिकर यांनी लिहीले. चांगला पानभर मजकूर झाला तो. अमेरिकेतील ‘एकता’ मासिकाचा ऑडियो दिवाळी अंक निघणार आहे. त्यात हे आपले पूर्ण पान ध्वनिमुद्रित असणार आहे. हा किती मोठा शुभशकून! आपण डिजिटल जागतिक पातळीवर आज जोडले गेलो आहोत. त्यात ही आणखी एक भर.

यानंतर प्रमुख पाहुण्या बागेश्री परीख यांनी आपले मनोगत व्यक्त करीत प्रभुतरुणाशी संबंधित त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. एका दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ त्यांच्या चित्राचे होते. गणपती बनविण्याची कार्यशाळा त्या मुलांसाठी घेतात. त्याविषयी प्रभुतरुणात फोटो झळकले. कायदेविश्वातील अनुभवांवर आधारित त्यांचे सदर माझ्या कारकीर्दीत होते ज्याचे पुढे पुस्तक झाले. याशिवाय मुंबई मराठी साहित्य संघातर्फे बदलापूरला झालेल्या महानगर साहित्य संमेलनातील त्यांचा सहभाग, साहित्य संघातील त्यांचे भाषण... या माझ्याशी संबंधित आठवणींना त्यांनी उजाळा दिला. त्यांचे अध्यक्षीय भाषण म्हणजे प्रभुतरुणाला मिळालेला आशीर्वादच होता.

या वाढदिवसाच्या सोहळ्याचा दुसरा टप्पा त्यानंतर सुरू झाला. गेल्या वर्षीप्रमाणेच संवादसत्र आयोजित केले होते. श्री. बन्सीधर धुरंधर आणि कल्पना राणे यांनी सुरेख संवाद साधत समाविष्ट जोड्यांना बोलते केले. यावर्षी या जोड्या होत्या दोन पिढ्यांच्या. आई-मुलगा, आई-मुलगी, बहीण-भाऊ, सासरा-सून, वडील-मुलगा अशा जोड्यांमधून पाठारे प्रभू ज्ञातीसाठी आणि प्रभुतरुणाचे उपक्रम राबविण्यासाठी काय करता येईल; याचा मागोवा घेण्याचा हा प्रयत्न होता. कुंदन आगासकर आणि सागरिका आगासकर, गौरांग कीर्तिकर आणि अनीश कीर्तिकर, श्रेया तळपदे आणि यश तळपदे, रिषभ राणे आणि ऱ्हेया राणे, प्रतिभा राणे आणि जयश्री राणे या जोड्यांनी आपापल्या परीने काही विचार मांडले. खाद्यजत्रा भरवावी पाठारे प्रभुंच्या विविध पदार्थांची, तरुणांनी अधिक सहभागी व्हावे, वेगवेगळ्या संस्थांनी एकत्रित येऊन फक्त पाठारे प्रभु ज्ञातीचा भव्य कार्यक्रम करावा, इंस्टाग्रामचा फायदा घ्यावा, नव्या पिढीला आपल्या ज्ञाती संस्कारांची ओळख करून द्यावी, तरुण पिढीचा सहभाग वाढावा... असे अनेक तोडगे काढले गेले. श्रोत्यांमधून गीता आंबवणे यांनी उत्स्फूर्त सूचना केली. तर संजना कोठारेंनी ज्ञातीयांकडून मिळणाऱ्या अल्प प्रतिसादाबद्दल खंत व्यक्त केली. मला वाटते की ही सर्वच ज्ञाती संस्थांची खंत असावी. पण प्रत्येकाने, विशेषत: नव्या पिढीने प्रामाणिकपणे आपले भविष्यवेधी मत नोंदवले. प्रत्येक सहभागीला रोपटे देऊन हा स्नेहाचा पूल जोडण्याचा प्रयत्न सफल झाला. परिसंवाद छानच रंगला.

कार्यक्रम असा रंगत असताना प्रभुतरुणाने कृतज्ञ भान राखत नुकतेच निधन पावलेल्या श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी विश्वस्त बन्सी धुरंधर म्हणाले की फुलांच्या हारामध्ये एकमेकांना धरून ठेवण्यासाठी जे दोऱ्याचे स्थान आणि महत्त्व असते; तसे महत्त्व सुहासिनी काकींचे होते. खरेच होते ते. गेल्या अंकात मी त्यांना म्हणूनच तर पहिल्या पानावर श्रद्धांजली वाहिली.

नंतर विश्वस्त मिथिल नवलकरने वाढदिवशी प्रभुतरुणासाठी आलेल्या देणगी आणि देणगीदारांची यादी वाचून दाखवली. दरवर्षीप्रमाणेच अनेक देणगीदारांनी देणग्यांचा वर्षाव केला. त्यांचे मनापासून आभार. एकूण कार्यक्रमाच्या संदर्भात सर्व सहभागी परभांचे, उपस्थितांचे आभार विश्वस्त गुंजारव नायकने मानले. दोन डिसेंबर रोजी दिनानाथ मंगेशकर नाट्यगृहात होणाऱ्या भव्य कार्यक्रमाची त्याने आठवण करून दिली. ‘शिरपेच’ पुरस्कारांसाठी जास्तीत जास्त सहभाग स्पर्धा असावी अशी अपेक्षा व्यक्त केली त्याने.

माझ्या हस्ते वाढदिवसाचा केक कापणे, आधी नाश्ता, मग मस्त जेवणाची मेजवानी होतीच; पण ही विचारांच्या देवाणघेवाणीची मेजवानी चिरकाल स्मरणात रहाणारीच होती. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. समीरा नवलकर यांनी फार नेटके आणि अर्थपूर्ण भावना व्यक्त करीत अप्रतिम केले. प्रभुतरुण हा ज्ञातीयांच्या परस्पर संबंधातील दुवा आहे. म्हणूनच त्याला वाढदिवशी दुवा देण्यासाठी मान्यवरांची मांदियाळी उपस्थित होती.

प्रभुतरुण चिरायू होवो!

*

# श्रावणमासी हर्ष मानसी

संकलन व लेखन : **संजय शरद दळवी**

( मागील अंकावरून)

**संतोषीमां-**

असे म्हणतात की श्रीगणेशाचे दोन पुत्र शुभ आणि लाभ त्यांना बहीण नसल्यामुळे हताश झाले होते. त्यांनी त्यांच्या वडिलांकडून एक बहीण मागितली. शेवटी नारद ऋषींच्या मध्यस्थीने त्यांनी श्रीगणेशास राजी केले. नंतर भगवान गणेशाने दैवीज्योतीतून संतोषीमातेची निर्मिती केली आणि रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर गणेशाच्या दोन पुत्रांना त्यांची बहीण मिळाली.

**कृष्ण आणि द्रौपदी -**

महाभारतातील एका आख्यायिकेनुसार, पांडवांची पत्नी द्रौपदीने भगवान कृष्णाला राखी बांधली तर कुंतीने भारतीय युद्धापूर्वी नातू अभिमन्यूला राखी बांधली.

**यम आणि यमुना -**

आणखी एक आख्यायिका सांगते की मृत्यूदेव यमाने १२ वर्षे आपली बहीण यमुना हिला भेट दिली नाही ज्याने ती खूप दु:खी झाली. गंगेच्या सांगण्यावरून यम आपली बहीण यमुना हिला भेटायला गेला, ज्याचा तिला खूप आनंद झाला आणि तिने आपला भाऊ यमाचे आदरातिथ्य केले. यामुळे यम प्रसन्न झाला आणि त्याने यमुनेला भेट मागायला सांगितले. यावर ती म्हणाली की, तू मला वारंवार भेटत राहा. हे ऐकून यमाने आपली बहीण यमुना हिला अमर केले. जेणेकरून तो तिला पुन्हा पुन्हा भेटू शकेल. हे पौराणिक वृत्तांत ‘भाईदूज’ नावाच्या सणाचा आधार बनवते जे भाऊ-बहिणीच्या नातेसंबंधावर देखील आधारित आहे.

**नागपंचमी**

नागपंचमी हा नाग किंवा सापांच्या पारंपारिक पूजेचा दिवस आहे ज्यामध्ये हिंदू, जैन आणि बौद्ध संपूर्ण भारत, नेपाळ आणि बौद्ध अनुयायी राहतात अशा इतर देशांमध्ये साजरा करतात. हिंदू कॅलेंडरनुसार, श्रावण महिन्याच्या तेजस्वी पाचव्या दिवशी ही पूजा केली जाते.

श्रावण महिना सुरू झाला की, अनेक सण साजरे केले जातात. श्रावणातील अनेक सणांपैकी नागपंचमीसुद्धा असंच एक पर्व आहे. नागपंचमीची माहिती आपल्यापैकी प्रत्येकाला असेलच. श्रावण महिन्यातील आराध्य दैवत भगवान शंकराला मानलं जातं. तसंच हा पावसाळ्याचा ऋतू असतो. असं मानलं जातं की, या काळात नाग बिळातून बाहेर पडून जमिनीवर येतात. या बाहेर पडलेल्या नागांमुळे कोणालाही अपाय होऊ नये म्हणून नागदेवतेला प्रसन्न करण्यासाठी नागपंचमीची पूजा करण्यात येऊ लागली; ज्याला नागपंचमी असं म्हटलं जातं. पण आज नागपंचमीलाच नाही; तर नागाला आणि नागसंवर्धनालासुद्धा खऱ्या अर्थाने महत्त्व प्राप्त झालं आहे.

असं म्हणतात नागपंचमीच्या दिवशी भगवान श्रीकृष्ण कालियानागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून सुखरूप आले होते. भगवान कृष्णाने कालियानागाचा पराभव केला आणि कृष्ण हे सामान्य मूल नाही हे उमजून नाग आणि त्याच्या पत्नींनी त्याच्या जीवाची भीक मागितली. गोकुळच्या रहिवाशांना तो यापुढे त्रास देणार नाही असे वचन दिल्यानंतर कृष्णाने कालियाला जीवे सोडले. कालियानागावर कृष्णाचा विजय साजरा करण्यासाठी नागपंचमी साजरी केली जाते.त्या दिवसापासून श्रावण शुद्ध पंचमीला नागपूजा केली जाते. यादिवशी भारतात नाग अथवा सापाला दूध, फळं, गोडाचे पदार्थ, फुले अर्पण केली जातात. नागपूजा

(पान ४ कॉलम ३ वर)

'हर्ष'

# आपण दु:खी आहात?

-हेमंत विनायकराव तळपदे

सुख आणि दु:ख या जीवनातील दोन अटळ गोष्टी आहेत. ''सुख पाहता जवाएवढे, दु:ख पर्वताएवढे'' हे संतवचन सर्वांनाच ज्ञात आहे. तरी देखील हा मानव सुखाच्या शोधात वणवण फिरत रहातो. सुखाची तीव्र लालसा या मानवाच्या मनी रुजल्याने तो त्यासाठी निरनिराळी कुकर्मेही करण्यास प्रवृत्त होतो. तसे पाहता प्रत्येकाची सुखाची व्याख्या ही व्यक्तिसापेक्ष असते. काही माणसे केवळ पैसे कमावण्यात सुख मानतात. तर काही मानव गोरगरीबांच्या सेवेत सुख मानतात. हे जग केवळ वाईट विचारांच्या अथवा वृत्तीच्या व्यक्तींनीच भरलेले नसून या जगात बऱ्याच अंशी पापभिरू माणसेही आहेत. ही माणसे केव्हाही इतरांचे वाईट व्हावे ही इच्छा जरादेखील मनी बाळगत नाहीत. पण त्याचबरोबर आपले भले व्हावे, आपल्या कुटुंबाला सुख लाभावे, आपल्याला चांगले आरोग्य प्राप्त व्हावे इतकी लहानशी अभिलाषा आपल्या मनाच्या कप्प्यात बाळगतात. तसे पाहता हे चूक आहे असे म्हणता येणार नाही. या जगात प्रत्येकाला सुखी होण्याचा अधिकार आहे. जर एक माणूस सुखी झाला तर तो त्याच्याबरोबरच्या इतरांनाही सुखी करण्याचा प्रयत्न करील, जशी एक पणती अंधारात प्रकाशित केलीत तर ती आसमंत प्रकाशित करेल. पण त्याबरोबरच त्या पणतीने इतरही पणत्या प्रज्ज्वलीत करता येतील अन् पाहता-पाहता सारा आसमंत उजळून निघेल. आजकाल पणत्यांची ही आरास पाहणेही आपल्याला दुर्लभ झाले आहे अन् चुकून एखाद्या देवळाच्या दिपमाळेवर अथवा एखाद्या व्यावसायिक नृत्याविष्कारास ही पणत्यांची आरास दिसली की आपण धन्य होतो. पण खरेच स्वत: आजमावून पहा, आपण जर आपल्या मनात चांगुलपणाची एक पणती प्रज्ज्वलीत केलीत तर काही काळात आपल्या भविष्यात स्थिर भवताल उजळून निघेल याबद्दल कोणताही संशय उरत नाही.

पण आता महत्त्वाचा प्रश्न पडतो तो म्हणजे आपण दु:खी का आहोत? तसे पाहता एखाद्या इसमाला चारचौघात ''काय रे तूं दु:खी आहेस का?'' असा प्रश्न सहजपणे विचारला तर तो मनात थोडासा घाबरेल आणि मग काहीतरी ठरवून ''हे रे, काय हा प्रश्न? तुम्हाला कोणी सांगितले की मी दु:खी आहे.'' मी तर माझ्या जीवनात खूप सुखी आहे. असे मखलाशी लावलेले उत्तर सहजपणे देईल. खरे पाहता एखाद्या नावडत्या गोष्टीला स्वीकारणे आपल्याला सहजी रुचत नाही. मग आपण ती गोष्ट टाळण्याचा प्रयत्न करतो आणि केव्हा केव्हा तर त्या गोष्टीच्या विरूद्ध अंगाने विचार करून लोकांसमोर ती गोष्ट फारच छान आहे असा आपल्या वर्तणुकीचा बागुलबुवा करतो.

पण खरे पाहता आपण दु:खी का आहोत? या प्रश्नाचे उत्तर त्याच्या विलोभात सहजपणे सापडेल. आपण दु:खी नाहीत म्हणून दु:खी आहोत हे सरळ उत्तर म्हणावे लागेल. मग या दु:खीपणाच्या स्थितीवर जास्त भाष्य न करता सुखी होण्यासाठी काय करावे याचा अधिक सामंजस्याने विचार करणे जास्त संयुक्तिक ठरेल.

या दु:खी होण्याची कारणे निरनिराळी असू शकतात. कोणी उचित अर्थप्राप्ती न होण्याने दु:खी होतात. तर कोणी प्रेमिकेचा वा प्रियकराचा आपल्या प्रेमाला उचित प्रतिसाद न मिळाल्याने दु:खी होतात. तर काही भरपूर प्रयत्न करूनही परीक्षेत आलेल्या अपयशामुळे अथवा कमी गुण मिळाल्याने दु:खी होतात. काही जण आपल्या प्रियजनांच्या वियोगामुळेही दु:खी होतात. यापुढे जाऊन असेही म्हणता येईल की काहीजण या जीवनात मी दु:खी आहे असे भासविण्याचा स्थायीभाव मनी बाळगल्यामुळेही दु:खी होतात. काही जोडपी तर अपत्यप्राप्ती न झाल्यामुळे दु:खी असतात तर काही जोडपी लाभलेली अपत्ये स्वार्थी वा अपंग निपजल्यानेही दु:खी असतात.

या दु:खी होण्याची कारणे वर नमूद केलेल्या कारणांपेक्षाही विभिन्न प्रकारची असू शकतात. पण मी तर म्हणेन की कारण कोणतेही असो पण मी दु:खी आहे हा भावच मनी बाळगणे हे या दु:खीपणाचे मूळ कारण आहे. ज्याप्रमाणे वाल्या कोळ्याला नारदमुनींनी तू 'मरा मरा' असा जप करत रहा असा उपदेश केला आणि त्या 'मरा मरा' जपाचा राम राम असा शाब्दिक भाव प्रकटला आणि त्या चिंतनातून वाल्याचा वाल्मिकी झाला तसेच मी दु:खी आहे हा भाव उलटवून मी सुखी आहे हा भाव मनी बिंबवत जावा आणि मग पहा की आपल्याला लाभलेले हे टिचभर जीवन कसे सुखाने भरून निघेल. हा बोध सहजसंभव आहे.

(पान ४ कॉलम ३ वर)

काही नवे - काही जुने

# अनपेक्षित

-नंदकुमार विजयकर

परवा नाशिकहून एका गृहस्थाचं मला पत्र आलं. माझी एक कथा त्याच्या वाचनात आली. ती त्याला एवढी आवडली की, कुटुंबातील सर्व सदस्यांना बसवून ती वाचून दाखवली. ती सर्वांना आवडली आणि त्या सर्वांनी पत्रात सह्या करून आपली पसंती कळवली. बरं वाटलं! ज्ञातीतील काही बुजुर्ग मंडळी, जी आता हयात नाहीत जसे की, प्रा. मुकुंद विजयकर, अॅडव्होकेट सुभाष प्रधान, श्रीयुत प्रताप वेलकर ह्यांनी वेळोवेळी त्यांच्या पसंतीची पोचपावती दिली आहे. आताही प्रभुतरुणाच्या संपादिका सुहासिनी कीर्तिकर, एखादा लेख आवडल्यास फोन करून तसे सांगतात. हे लोक जेव्हा माझी प्रशंसा करतात तेव्हा मी बऱ्यापैकी लिहीत असणार असं समजायला हरकत नाही. पण गेले कित्येक महिने माझ्याकडून काहीच लिहून झालं नव्हतं. याला कारण म्हणजे माझा आळशीपणा. आता कोणीतरी म्हटलं आहे, लिहिणं एक 'पेनफुल प्रोसेस' आहे. आता या कळा लेखकाला सोसाव्या लागतात की त्याच्या वाचकाला; हा वादाचा विषय ठरेल. माझी पहिलीवहिली कथा 'दैनिक सामना' मध्ये प्रसिद्ध झाली. त्यावर आमच्या मित्राची प्रतिक्रिया 'काय रे, तुझी ओळख आहे वाटतं?' मी म्हटलं, ''हो. स्वत: बाळासाहेब घरी येऊन कथा घेऊन गेले.' अर्थात हे सर्व मनातच. मुद्दा असा की, लोक अचानक काय म्हणतील काही सांगता येत नाही.

बऱ्याचवेळा काय होतं की, आपण काही तरी बोलतो. समोरचा माणूस ते ऐकतो आणि त्याला ते समजलंय असं आपण धरून चालतो. पण ऐकणाऱ्याची जी अनपेक्षित प्रतिक्रिया मिळते, त्याने या गृहीतकाला तडा जातो. आता यात आपली काहीतरी चूक असावी किंवा ऐकणाऱ्याची समज कमी असावी. आपण काही गोष्टी आधीच गृहीत धरून चालतो. पण समोरच्या माणसाला त्याचा गंधही नसतो, आणि अनपेक्षित गैरसमजाचा गोंधळ होतो.

मला आठवतं, त्या वेळी माझी मुंबईहून पुण्याला बदली झाली होती. मी एकटाच पुण्याला जाणार होतो. आमच्या बँकेच्या पुणे विभागात बऱ्याच शाखा होत्या. पण शक्यतो पुणे शहरातील शाखा मिळाली तर बरं झालं असतं. मी त्याच प्रयत्नात होतो. कर्मधर्मसंयोगाने मला पुणे शहरातील रविवार-पेठ शाखा मिळाली. सगळं जग जिंकलं या आवेशात हातात पोस्टींग ऑर्डर घेऊन जवळच्या सिटी पोस्ट ऑफिसमध्ये धाव घेतली. तिकडून मुंबईला तार केली. त्यावेळी आजच्यासारखी एस.टी.डी, सेल फोन यांची सोय नव्हती. तारेत फक्त एवढच लिहीलं- आर. पी. पूना. पत्नीच्या हातात तार पडली. त्या आर. पी. पूना चा तिला काही अर्थबोध होईना. शेजारीच काकांचं घर होतं. ती तार घेऊन त्यांच्याकडे गेली. अनाबाबूने तार बराच वेळ पाहिली. मग हसून म्हणाला, ''अगं आर. पी. म्हणजे रम प्यायेला. तुझा नवरा पुन्हा रम प्याला.'' पाहिलंत? सरळ पोस्टींग अॅट रविवार पेठ असं लिहीलं असतं तर हा घोळ झाला नसता.

मी बँकेतून निवृत्त होण्याआधी पाच वर्षे संगणीकरणाचे वारे वाहू लागले. हळूहळू सर्व शाखा संगणीकृत होत होत्या. या बदलाला तोंड देणं जरा कठीणच गेलं आणि अचानक एक दिवस माझी डी.बी.ए. म्हणून नियुक्ती झाली. डी.बी.ए. म्हणजे 'डेटाबेस अॅडमिनिस्ट्रेटर' या कामाला मीच काय तो लायक उमेदवार होतो. कारण एकच, मी आमच्या माहीम शाखेजवळ राहत होतो. सर्वांच्या आधी जाऊन सिस्टीम चालू करायची. संध्याकाळी 'डे एन्ड, बॅक अप' करून सिस्टीम शटडाऊन करायची आणि सिस्टीमचं एकूण आरोग्य सांभाळायचं. संध्याकाळी हे सर्व करेपर्यंत शाखेत मी आणि वॉचमन उरत असू. एका संध्याकाळी मी असाच बसलो होतो. सिस्टीम काही केल्या बंद होईना. मी बराच प्रयत्न केला पण काही जमेचना. शेवटी टी.सी.एस्. कंपनीच्या इंजीनिअरला फोन केला. तो मला फोनवरून सूचना देत होता आणि मी त्याप्रमाणे काम करत होतो. अर्धा तास गेला पण यश येईना. अगदी मेटाकुटीला आलो. इतक्यात माझ्या ओळखीचा एक इंजिनीअर फोनवर आला. आल्या आल्या त्याने प्रश्न केला, 'विजयकर साहेब, आपण कोठे आहात?' मी ताबडतोब उत्तरलो, 'माहीमला.' पलीकडून जोरजोरात हसण्याचा आवाज आला. 'अरे, तसं नाही. आपण स्क्रीनवर एक्झॅटली कोठे आहात?' 'ओ हो, असं काय?' आणि मग सर्व काही मार्गी लागलं. एकदा माझ्या पत्नीने विचारलं, 'काय हो, हे डी.बी.ए. म्हणजे काय?' मी शांतपणे म्हणालो, 'डी.बी.ए. म्हणजे देरतक बैठनेवाला आदमी' बरेच

(पान ५ कॉलम ३ वर)

आठवणींच्या साठवणीतून

# हौस

-डॉ. सुमन नवलकर

(९)

२६ जानेवारीच्या आगे- मागे दोन-तीन दिवस कॉलनीतून लॉरी निघायची. प्रत्येक जण वर्गणी भरून आपापल्या कुटुंबियांसाठी लॉरीतली जागा सुनिश्चित करायचे. रात्री व्ही. टी. स्टेशन, महानगरपालिकेची इमारत, गेटवे ऑफ इंडिया अशा मुंबईतल्या महत्त्वाच्या इमारतींवर रोशणाई केलेली असायची. लॉरीत बसून ती रोशणाई पाहात फेरफटका मारायला अतिशय मौज वाटायची. दादा आमची सर्वांची तिकिटं काढायचे. याही वेळी काढायची होती. पण नेमका शाळेचा वार्षिक समारंभ आणि रोशणाई पाहायसाठीची सहल एकाच दिवशी आली. मी शाळेच्या नृत्य-वर्गाची विद्यार्थिनी होते. साहजिकच शाळेत कुठलाही कार्यक्रम असला, की नृत्यवर्गाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींची एक-दोन नृत्ये तरी त्यात समाविष्ट केलेलीच असत. पंचवीस जानेवारीचा शाळेचा कार्यक्रम आधीपासूनच ठरला होता. नेमकी कॉलनीची रोशणाई पाहायसाठीची सहलही त्याच दिवशी ठरली, म्हटल्यावर मग काय? सर्वांचाच हिरमोड होऊ नये म्हणून, आईने दोघा मुलांना घेऊन सहलीला जायचं आणि दादांनी माझ्या कार्यक्रमासाठी माझ्याबरोबर थांबायचं, अशी तडजोड- विभागणी केली आणि दादा माझा कार्यक्रम पाहायसाठी शाळेत आले.

आम्हा मुलींचं शेतकरी नृत्य होतं. अर्ध्या मुली शेतकरी झाल्या होत्या आणि अर्ध्या शेतकरणी. तर शेतकऱ्याचा पेहेराव करून, मुंडास्याच्या आत केस लपवून आणि चेहऱ्याची रंगरंगोटी करून झाल्यावर शेवटच्या क्षणी सरांच्या लक्षात आलं, की यांच्या कानात डूल, हातात बांगड्या वगैरे आहेत. मग सर म्हणाले, 'शेतकरी झालेल्या मुलींनी आपापले डूल-बांगड्या काढून ठेवा. माझ्या कानांत मावशीने दिलेले सोन्याचे डूल होते. चार मोत्यांची चौकट आणि खाली जांभळट लांबुडका खडा असे मावशीचे कानातले, तिला मुलगी नसल्याने तिने मला देऊन टाकले होते. होते नऊ-दहा वर्षांची. पण थोडी-फार अक्कल तर होतीच. डूल कानांतून काढून माझ्या कपड्यांच्या पिशवीत अगदी तळाला घालून ठेवले. तेवढ्यात आमच्या नृत्याची वेळ झाल्याचं जाहीर झालं. आम्ही सर्वजणी रंगमंचाकडे गेलो. नृत्य फारच छान झालं. आमचं नृत्य कार्यक्रमाच्या शेवटी-शेवटीच होतं. शिवाय घरही शाळेच्या अगदी समोर. त्यामुळे, 'आता कपडे घरी जाऊनच बदलू,' असा सूज्ञ विचार करून मी खोलीत जाऊन माझी पिशवी घेतली. पायांत बूट सरकवले आणि प्रेक्षकांमधे जाऊन दादांना शोधलं. मी आणि दादा घरी पोहोचलो तरी रोशणाई पाहायला गेलेलं त्रिकूट परतलेलं नव्हतं.

तेवढ्यात दादांचं लक्ष माझ्या कानांकडे गेलं. ''अग, कानातले कुठे ठेवलेस तुझे?'' मी म्हटलं, ''ठेवलेत नीट. कपड्यांच्या पिशवीत अगदी खा...ली घालून ठेवलेत.'' असं म्हणत मी पिशवीच्या आत तळाला हात खुपसला. हाताला काहीच लागलं नाही. मग भराभर पिशवीतून कपडे उपसून काढले. एकेक कपडा झटकला. पिशवी उलटी करून पाहिली. कानातले नव्हतेच. ''कानातले तेव्हा सरांकडे देऊ केले होते, पण सर म्हणाले, ठेवा आपापले स्वत:जवळ. मी किती जणांचे सांभाळणार?'' आता मला रडूच यायला लागलं. ''तुमच्याकडे तरी आणून द्यायला हवे होते. पण नाचासाठीचे कपडे-मेकप सगळं झालं होतं ना करून? शिवाय एवढ्या माणसांमधे तुम्हाला शोधणं पण कठीण होतं ना दादा?'' मला खूपच रडू यायला लागलं. दादा भारी प्रेमळ. जराही रागावले नाहीत. तेवढ्यात रोशणाई पाहायला गेलेलं त्रिकूटही आलं. आईलाही कळलं, कानातलं गेल्याचं. कोणीतरी मला ते पिशवीच्या तळाला घालून ठेवताना पाहिलं होतं. मग आम्ही मंचाकडे गेल्यावर ते पिशवीतून काढले होते. माणसं दुसऱ्याच्या वस्तू चोरून कशी सुखाने राहू शकतात? त्यांना अपराधाची भावना शिवतही कशी नाही? मला हे प्रश्न बालपणापासून पडत आले आहेत. गोर-गरीबाना जे विकत घेणं शक्य नसतं, ते अशा प्रकारे मिळवत असावेत. पण आपल्यालाही अनेक गोष्टी अप्राप्य असतातच ना? मग आपण कुठे मिळवायला का जात नाही त्या अशाप्रकारे? कधीकधी मी माझ्या मनाची समजूत घालते, की ज्यांनी कोणी माझे कानातले चोरले, त्यांनी आपल्या मुलीची हौस ते तिच्या कानांत घालून पुरवली असेल. चला! एका गरिबाला तरी काहीतरी चांगलं मिळालं. पण माझ्या मावशीने मला हौशीने दिलेले ते कानातले माझी हौस पुरवू शकले नाहीत, याची खंत आजही आहे.

मो.८७७९९१९४०४२

(पान ३ कॉलम २ वरून)

आता या दु:खदायी कारणांची मीमांसा करू. आर्थिक प्राप्ती कमी आहे म्हणून दु:ख करत बसण्यापेक्षा आहे त्या अर्थाजनात कसे सुखी राहता येईल याचा विचार करावा. दु:ख जर शारीरिक व्याधींचे असेल तर त्यावर शक्य असेल तर तज्ञ डॉक्टरांकडून उपचार करावेत आणि तरीही या व्याधींपासून आपली सुटका होणार नाही असे वाटत असेल तर आपले उर्वरीत आयुष्य या भगवंतावर विश्वासावे. कारण कदाचित योग्य वेळी तो या व्याधींचे निराकरण करेल. प्रेमिका अथवा प्रियकराच्या वियोगाने प्राप्त झालेल्या दु:खाचा इलाज काळच चांगला करू शकतो. अशी दु:खे आपल्या जीवन कालक्रमणात जास्त वेळ टिकत नाहीत. आपण अनुभवातून त्यावर उपाय शोधतोच व आपले जीवन नव्या उमेदीने सुरू करतो. अपत्यप्राप्ती न होण्याचे दु:ख कधीकधी ही क्रूर नियती आपल्याला देत असते. पण सध्याच्या या प्रगत वैज्ञानिक जगात या दु:खावरचे मलम आयव्हीएफ, सरोगसीसारख्या माध्यमातून मिळू शकते. अथवा मूल दत्त घेणे हा देखील यावर उपाय निघू शकतो.

पण या सर्वांवर एक जालीम उपाय म्हणजे मी मुळीच दु:खी नाही ही भावना आपल्या मनात सातत्याने बाळगणे होय. हे म्हणणे सोपे असले तरी आपल्या आचरणात सर्वच आणणे कठीणच आहे. कारण कितीही म्हटले, 'मी जरादेखील दु:खी नाही'. तरी मनाच्या एका कोपऱ्यात माझे हे दु:ख दडून रहाते. पण जर आपण स्वत: निश्चयाने या दु:खाला बाजूस सारले तर आपले जीवन सुखी होण्यास फार विलंब लागणार नाही.

जगात अशी अनेक माणसे सापडतील की ती कितीही संकटे ओढवली, कितीही दु:ख भोगावे लागले तरी स्थितप्रज्ञ वृत्तीने आपले जीवन मार्गक्रमण नियमितपणे सुरू ठेवतात. तर काहीजण आपल्या छोट्याशा दु:खाचा बागुलबुवा करतात.

तर सरतेशेवटी मी इतकेच म्हणेन की देवाने आपल्याला हे सुंदर आयुष्य जगण्यासाठी दिले आहे. जगणे हा आपला मूलभूत हक्क आहे असे मानावे आणि ही दु:खाची जळमटे बाजूला सारून येईल त्या प्रसंगी सुखाने जीवन व्यतीत करावे. हेच आपण दु:खी का आहोत? या प्रश्नाचे खरे उत्तर ठरेल. असो.

मोबा. ९८२१६०७५९३

(पान २ कॉलम ४ वरून)

करण्यासाठी नागाची मातीची प्रतिमा घरात स्थापन केली जाते. सुवासिनी यादिवशी नागाला भावाप्रमाणे मानून त्यादिवशी त्याच्यासाठी उपवास करतात. भगवान शंकराच्या गळ्यात नागाला स्थान असल्यामुळे शंकराच्या मंदिराबाहेर नागपंचमीसाठी भाविक गर्दी करतात.

असे मानले जाते की तांदळाचे पदार्थ आणि लाडू हे नाग देवतेला आवडतात. त्यामुळे लोक उकडीचे मोदक, लाडू (उंडे), हलबाई, कडूबू, अरिशिनाएले कडूबू, इल्लूपंचकज्ज इत्यादी विविध प्रकारचे पदार्थ नागाला अर्पण करतात. नागपंचमीला तयार केलेले पदार्थ किंवा पाककृती प्रदेशानुसार बदलतात.

**हरियालीतीज**

हरियालीतीज हा सण उत्तर भारतातील महिलांद्वारे साजरा केला जातो - मुख्यत: राजस्थान, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार आणि झारखंड या राज्यांमध्ये. मोठ्या थाटामाटात आणि भव्यतेने साजरी केलेली, हरियालीतीज देवी पार्वतीसोबत भगवान शिवाचे मिलन साजरी करते. श्रावणीतीज, छोटीतीज, आणि मधुसर्वतीज यांसारख्या अनेक नावांनी ओळखला जाणारा, हरियालीतीज हा विवाहित महिलांसाठी करवाचौथप्रमाणेच महत्त्वाचा सण मानला जातो. हरियालीतीज कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्रप्रदेशातील महिलांद्वारे देखील साजरी केली जाते, जिथे या उत्सवाला गावरी हब्बा म्हणतात.

**पोळा**

पोळासुर या राक्षसाने लहानपणीच कृष्णावर हल्ला केल्यामुळे त्याला पोळा म्हणतात. त्यामुळे यादिवशी लहान मुलांना विशेष वागणूक दिली जाते.

पोळा हा महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील शेतकऱ्यांद्वारे साजरा केला जाणारा कृतज्ञता सण आहे. शेती आणि शेतीच्या क्रियाकलापांचा एक महत्त्वपूर्ण भाग आहेत अशा बैल आणि बैलांचे महत्त्व ओळखण्यासाठी, व त्यांच्या कष्टांबद्दल आभार मानण्यासाठी हा सण साजरा केला जातो. श्रावण महिन्यातील पिठोरी अमावस्येला, म्हणजेच श्रावणातील शेवटच्या दिवशी पोळा हा सण येतो. शेतकरी यादिवशी आपल्या बैलांना सजवतात आणि नंतर सणासाठी त्यांची पूजा करतात. शेतकऱ्यांनी शेतीच्या कामात केलेल्या मदतीबद्दल बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो.

(क्रमश:)

---

*चुकीची दुरुस्ती*- मागील अंकात परीक्षेतील सुयश सदरात एच एस सी च्या निकालात श्री नितेश राजशेखर राणे ऐवजी श्री मितेश राजशेखर राणे असे वाचावे.

# The rich experiences of Mrs. Tara Ravindranath Menon

I was born Tara Dharadhar, in Bombay in 1936, into a Pathare Prabhu family, to Sudha & Gajanan Ramchandra Dharadhar. From the time of my birth till I got married in 1957, I lived in a large house in Navi Wadi – the heart of Girgaum. My parents being outgoing & progressive, we had all kinds of friends. In particular one of my father's colleague Joseph Reuben and his family, were the closest to us. Joe Uncle & Hannama auntie and their children were like family to us.

Equally, we were close to my immediate uncles & aunts, and my cousins. This aspect of having friends across the spectrum, gave my brother Subhash and me a very liberal view of the world. Thanks to the Reuben family, I met P. K. Ravindranath, a Malayalee and a journalist, who was a good friend of one of the Reuben brothers – Bunny Reuben, the famed film journalist. Ravi, as he was called by close family and friends, and I fell in love and got married in November 1957.

My marriage to a Malayalee brought about a big and positive change in my life. I not only moved out of my mother's house in Navi Wadi (my father had passed away earlier), but I moved into my husband's cousin's house, as a temporary measure, in what was for me a far-away place, Juhu. This move was tremendous on many counts. I moved out of my cosy & comfortable zone of my home, but was warmly welcomed by my husband's aunt, her son Swamidass Menon, who went on to become a leading creative director with a leading advertising agency in India, and a few of his cousins, who lived in the Juhu house.

The big challenge for me was to communicate with my husband's aunt, who only knew Malayalam. So, initially through sign language, and then through my effort to learn Malayalam, I managed to make myself happy with my new family. Very often with hilarious outcomes, as I was still learning the language and making all kinds of funny mistakes.

From there on my journey to learn both the Malayalee language and culture went on full speed. By the grace of god, I was able to speak the language fluently in a few years. Though we moved to our own rented flat in Byculla, I maintained regular contact with the Juhu family, as well as other Malayalee friends of my husband. After we moved to Patrakar colony in Bandra East in the early 70s, I became a member of the Bombay Keraliya Mahila Samaj, where I eventually became a committee member, and was one for many decades. In the process, I also gave speeches in Malayalam, though I must confess that I wrote my speeches using the English or Marathi script, as learning to read & write Malayalam was difficult at that time for me.

With my husband being an active journalist, and also involved with political parties, where he was part of their think-tanks, and an advisor, our house was constantly filled with people from all over the country, and quite a few from abroad too.

This gave me the opportunity to learn about so many Indian cultures and cuisines. Being fond of cooking, also got me featured in a few magazines and newspapers, where they spoke about my background and my culinary experiences.

Another important aspect was my active involvement and set up of the Mumbai Grahak Panchayat in 1975. MGP was set up primarily to help consumers get household products at reasonable prices and quality, as at that time there was a lot of fluctuation in prices and quality. Very often the middle men and traders would either reduce or adulterate the quality, or also increase the prices exorbitantly. MGP therefore would buy only Indian made products, directly from the manufacturers, along with commodities like rice, sugar, wheat, spices etc., directly from the growers. This eliminated the middle man, and ensured a lower price and a guaranteed quality to the consumer. I am proud to say that from a small base of a few hundred households / consumers, we now have thousands of consumers across Maharashtra.

I was part of the purchase committee of MGP from the late 70s. So, we had to travel to different parts of India to meet the growers & manufacturers, to check their produce, negotiate the volume/prices, quality assurance, and delivery schedules. For close to 20 years, I played an active role with the purchase committee, travelling across the country, be it to buy chilies from Maharashtra & Andhra Pradesh, sugar from Kolhapur, haldi from Tamil Nadu etc. I was recently recognised by the MGP for my service and contribution of 40 years! They presented me a trophy!

In addition to all this I was also a mother to three children – Jayesh, Anuja & Naresh. With the active support of my mother initially, when I was working and, the continued love and support of my husband P. K. Ravindranath, I enjoyed not just a happy family life, but equally a wonderful social life. I also got to travel not just to many parts of India, but also the world. My travels and the learnings from all my travels, have made my life experiences so rich and memorable.

The idea of my penning my thoughts and experience swere to encourage our young Pathare Prabhu community, to always be open to new ideas, new experiences, and to travel the world, meet new people, learn about fascinating new cultures, cuisines, and environments. It will make you a better, happier and more progressive person.

*

---

(पान ३ कॉलम ४ वरून)

दिवस तिचा हा समज कायम होता.

मी अनुभवलेली एक अनपेक्षित घटना मला अजूनही आठवते. पुण्याला जाण्यासाठी मी दादर स्टेशनवर उभा होतो. 'डेक्कन एक्सप्रेस'च्या आधी साऊथला जाणारी कुठलीतरी गाडी आली. लोकांची एकच झुंबड उडाली. त्या गडबडीत एक पैशाचं पाकीट उडून माझ्या पायाजवळ पडलं. माझा मित्र ते पाकीट उचलायला बघत होता. पण मी ते पायाखाली दाबून ठेवलं. न जाणो, त्या पाकीटमारांची टोळी जवळपास असायची आणि चोर चोर म्हणून आम्हालाच बदडून पाकीट लंपास करायचे. गाडीत बसल्यावर मी पाकीट उघडून पाहिलं. त्यात जवळ जवळ दहा-बारा हजार रुपये होते. बरोबरच पिंपरीतल्या एका इंजिनिअरींग कंपनीचं कार्ड होतं 'चिन्नप्पा' आणि रोल नंबर. पुण्याला पोहचल्यावर मी त्या कंपनीला माहिती कळवली. त्यांनी मला 'चिन्नप्पा'च्या गावाचा पत्ता कळवला. मी लगेच केरळातल्या पालघट गावी त्याला पत्र टाकून आमच्या रविवार पेठ शाखेत येण्यास कळवलं. आता याला दोन महिने तरी लोटले असतील. एक दिवस शिपाई येऊन सांगून गेला. 'साहेब तुम्हाला भेटायला कोणीतरी आलं आहे.' पाहिलं तर दूरवर कोपऱ्यात एक साधारण उंचीचा, काळा-सावळा माणूस अंग चोरून उभा होता. मी त्याला जवळ बोलावलं. त्याने माझ्या हातात एक चिठ्ठी दिली. ते मीच पाठवलेलं पत्र होतं. 'चिन्नप्पा?' त्याने मान डोलावली. मी त्याला म्हटलं 'घाबरु नकोस, तुझे पैसे माझ्याकडे सुरक्षित आहेत.' त्याच्या मुलीच्या लग्नासाठी तो हे पैसे घेऊन गावाला चालला होता. पण पाकीट मारल्यामुळे ते आता लांबणीवर पडलं होतं. मी चिन्नप्पाला पैसे दिले. त्यातले अर्धे पैसे त्याने माझ्या टेबलावर ठेवले. ''साहेब हे तुमच्यासाठी''. ''अरे वेडा की काय! मला पैसे हवे असते तर तुला मी बोलावलंच नसतं.' चिन्नप्पा घळाघळा रडूच लागला. त्याला समजावून पाठवून दिलं.

असे अनुभव, अनपेक्षित प्रतिसाद, अकल्पित मिळणाऱ्या प्रतिक्रिया हे सर्व आपल्या नेहमीच्या जीवनात थोडासा विरंगुळा आणतात. असे अनुभव मागून मिळत नाही. ते अचानक भेटतात, चकित करतात, गंमत आणतात कधी आपली फजिती झाली असेल, प्रसंगी रागही आला असेल, पण नंतर हे जेव्हा आठवतो तेव्हा हसूच येतं. या सर्व गंमतीत तुम्हालाही सामील करून घेण्याचा माझा एक छोटा प्रयत्न.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळसाखर दिला

२४-८-२३ श्री. आशय अरविंद व्यवहारकर कु. आदिती सुनील शिंदे (आं.ज्ञा.)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| १७-६-२३ | डॉ. कु. विमल एस. नवलकर, | वय १०२, | सांताक्रूझ |
| ४-८-२३ | श्री नीलेश विठोबा नायक, | वय ६१, | बोरीवली |
| १-८-२३ | श्रीमती सुनीता सुरेश कोठारे | वय ८९, | अंधेरी |
| ७-८-२३ | श्रीमती नलिनी अशोक दत्तात्रय कोठारे | वय ५५, | ठाकुरद्वार |
| ८-८-२३ | श्रीमती सरोज मंगल नायक | वय ७९, | आंबोली, अंधेरी |
| ९-८-२३ | श्री आल्हाद पद्मसेन गोरक्षकर | वय ६५, | दादर |
| १०-८-२३ | श्रीमती नीना अनंत राव | वय ८२, | बामनपाडा, अंधेरी पूर्व |
| २०-८-२३ | श्रीमती नंदिनी सुबोध देसाई, | वय ९२, | अंधेरी (पूर्व) |
| २९-८-२३ | कु. शैलजा रामराव कीर्तिकर | वय ९५ | खार |

## प्रभुतरुणास देणगी

**प्रभुतरुणाच्या शताब्दी वर्धापनदिना-निमित्ताने आलेल्या देणग्या :-**

✶ सौ. नेत्रा अजित विजयकर आणि श्री. अजित मोरोबा विजयकर यांजकडून रु. २१,०००/-

✶ सौ. बागेश्री योगेन परीख यांजकडून रु. १०,०००/-

✶ श्री शरद बाळाराम राणे यांच्या स्मृत्यर्थ श्री सुनील राणे यांजकडून रु. ५,००१/-

✶ श्रीमती सुहासिनी सुहास कोठारे यांच्या स्मृत्यर्थ श्री दीपक सुहास कोठारे यांजकडून रु. ५,०००/-

✶ तेज पी. वेलकर यांजकडून रु. ५,०००/-

✶ सौ. नीलन आणि श्री. दीपक माधव धैर्यवान यांजकडून रु. २,५०१/-

✶ श्री. अनिल तळपदे यांजकडून २५०१/-

✶ सौ. अचला आणि श्री. सुभाष रमाकांत देसाई याजकडून रु. २,०००/-

✶ सौ. अचिला आणि श्री. विराज धैर्यवान यांजकडून रु. २,०००/-

✶ श्रीमती मीना रमेश जयकर यांजकडून रु. १,००१/-

✶ सौ. प्रतिमा आणि श्री. विनोद जी. प्रधान यांजकडून रु. १,०००/-

✶ श्रीमती वृंदा श्याम जयकर यांजकडून रु. १,०००/-

✶ सौ. सुरुची आणि श्री. अनिल प्रधान यांजकडून रु. १,०००/-

✶ श्री. शरद शामराव कोठारे यांजकडून रु. १,०००/-

✶ सौ. निशा यांच्या स्मृत्यर्थ श्री श्रीनल शरद कोठारे यांजकडून रु. १,०००/-

✶ कु. वैशाली अजिंक्य यांजकडून आजीव सदस्यत्व रु. ५००/-

सर्व देणगीदारांना शुभेच्छा आणि देणग्यांबद्दल मनापासून आभार.

## अभिनंदन

✶ तितीक्षा इंटरनॅशनलतर्फे देण्यात आलेल्या राष्ट्रीय पुरस्कारात डाँ सुमन नवलकर यांच्या 'मिन्नीचं घर उन्हात' या कादंबरीसाठी प्रथम पुरस्कार आणि 'अंधारयात्री' या कथासंग्रहासाठी तृतीय पुरस्कार प्राप्त झाला.

✶ ११ते १५ऑगस्ट दरम्यान तैवान येथे झालेल्या ३९व्या एशियन इंटरनॅशनल स्टॅंप कलेक्शन प्रदर्शनात नॅशनल कमिशनर म्हणून सॉलि. राजन जयकर यांना उपस्थित रहाण्याचा सन्मान प्राप्त झाला.

✶ आचार्य यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय मराठी महिला मंडळातर्फे प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचे 'अत्र्यांनी खेळलेले साहित्यिक वाद' या विषयावर व्याख्यान झाले.

✶ विवान श्रीपाद आगासकर या कुमाराला १९, २० ऑगस्ट रोजी झालेल्या प्रो. जिगोरो कानो इंटरनॅशनल, मुंबई संस्थेतर्फे झालेल्या जुडो स्पर्धेत ब्राँझ पदक मिळाले.

✶ मृदुला प्रभुराम जोशी यांचे कॅनडात रहाणारे चिरंजीव अतुल यांनी टोरांटो येथील नाथन फिलिप्स स्केअर येथे झालेल्या भारत स्वातंत्र्य महोत्सवात गाणी पेश केली.

✶ श्री. नंदकुमार अरविंद धुरंधर यांची यशोगाथा 'झिरो टू हिरो' या पुस्तकात समाविष्ट झाली.

✶ कु. वैष्णवी वाझकर यांना कराटे २०२३च्या जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त झाले.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## पाठारे प्रभु सोशल समाज

दिनांक २७/८/२३ रोजी पाठारे प्रभु सोशल समाजाच्या कार्यकारिणीची निवड करण्यासाठी खार येथील पा. प्र. सांस्कृतिक सभागृहात निवडणूक पार पडली. पुढील सभासद निवडून आले.

श्रीमती शिल्पा प्रकाश धुरंधर, श्री. विजय गजानन धुरंधर, श्री. अमोघ श्रीकृष्ण कीर्तिकर, श्री. अनिरुद्ध मल्हारी कीर्तिकर, श्रीमती माधुरी उदय किर्तिकर, सौ. नूतन जयंत कीर्तिकर, श्री. प्रसाद मुकुंद कीर्तिकर, श्री. तुषार अनंत कीर्तिकर, सौ. पल्लवी परेश कोठारे, श्री. सुमेध रविकांत कोठारे, श्री. मिलींद मनोहर सेंजित, श्रीमती स्वाती प्रवीण राणे, सौ. उन्नती उल्हास राणे, श्री. सतेजचंद्र जयवंत तळपदे आणि श्री. अभिजित सुरेश विजयकर. निवडणूक अधिकारी म्हणून श्री. अतुल एम्. जयकर आणि श्री. अजित एम्. जयकर यांनी काम पाहिले.

सौ. नीता मिलिंद सेंजित आणि श्री. जयंत बाळकृष्ण कीर्तिकर हे सहकार्यवाह म्हणून बिनविरोध निवडून आले. सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा.

✳

## परीक्षेतील सुयश

**एल एल बी (मुंबई विद्यापीठ)**

कु श्रुती जयदीप जयकर
सीजीपीआय ७/-

## पाठारे प्रभू महिला समाज

रविवार दिनांक १३/८/२३ रोजी महिला समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा दुपारी तीन वाजता घेण्यात आली. सभेनंतर सर्व भगिनींना अधिक महिन्याचे हळदीकुंकू, म्हेसूर आणि गजरा देण्यात आला. याच दिवशी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. निकालासह त्या खालीलप्रमाणे-

✶ ***स्मरणशक्ती स्पर्धा*** (गाळलेले शब्द भरून म्हणी पूर्ण करणे)- *पहिले पारितोषिक*- दिप्ती राजन विजयकर, *दुसरे पारितोषिक*- निशा दीपक धराधर, *तिसरे पारितोषिक*- स्वप्ना विनीत जयकर.

✶ ***फॅन्सी वर्क स्पर्धा*** (भिजवलेल्या कणकेपासून कलात्मक वस्तू बनवणे) *पहिले पारितोषिक*- हेमा रामचंद्र जयकर, *दुसरे पारितोषिक*- स्वप्ना विनीत जयकर.

✶ ***कलाकौशल्य स्पर्धा*** (कलात्मक केशरचना करणे)- *पहिले पारितोषिक*- हेमा रामचंद्र जयकर, *दुसरे पारितोषिक*- वैदेही राकेश राणे.

या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून विश्वस्त मेघना प्रदीप राणे आणि विश्वस्त नीता मिलींद सेंजित यांनी काम पाहिले. महिला समाजाकडून अल्पोपहार आणि थंडगार पेय उपस्थितांना देण्यात आलेच; पण त्याबरोबरच सौ. नीलम जयपाल नवलकर यांजकडून मातोश्री कै. श्रीमती सीना वामनराव कोठारेस्मरणार्थ अल्पोपहार देण्यात आला.

✳

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67